# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## // विशेष महासभा बैठकीचे कार्यवृत्त // (ऑनलाईन अपद्वारे)

**सभा क्रं. - २५** **दि.०३/०२/२०२१**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.०३/०२/२०२१ बुधवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.सोनवणे भारती कैलास यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी ऑनलाईन पध्दतीने खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.सोनवणे भारती कैलास, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| खडके सुनिल वामनराव, उपमहापौर | भोईटे लताबाई रणजीत | ढेकळे सदाशिव गणपत |
| जोहरे प्रिया मधुकर | पाटील प्रतिभा सुधीर | पाटील राजेंद्र झिपरु |
| नेरकर सरिता अनंत | पाटील चंद्रशेखर शिवाजी | महाजन सुनिल सुपडु |
| पोकळे दिलीप बबनराव | कापसे मयुर चंद्रकांत | महाजन जयश्री सुनिल |
| खान रूकसाना बी गबलु | कापसे प्रतिभा चंद्रकांत | शेख शबानाबी सादीक |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | पाटील विजय पुंडलिक | नाईक प्रशांत सुरेश |
| बाविस्कर किशोर रमेश | बारी शोभा दिनकर | आहुजा मनोज नारायणदास |
| कोळी दत्तात्रय देवराम | शेख हसीनाबी शरिफ | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| सपकाळे रंजना भरत | पाटील कुलभुषण विरभान | सोनार रंजना विजय |
| कोल्हे प्रविण रामदास | भिल पार्वताबाई दामु | खडके विश्वनाथ सुरेश |
| सनकत चेतन गणेश | पाटील उषा संतोष | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| चौधरी चेतना किशोर | कोल्हे ललित विजय | देशमुख सुन्नाबी राजु |
| भंगाळे विष्णू रामदास | बरडे नितीन मनोहर | शेख सईदा युसूफ |
| सोनवणे राखी शामकांत | बेंडाळे उज्वला मोहन | पटेल इब्राहिम मुसा |
| तायडे ज्योति शरद | राणे गायत्री इंद्रजित | सोनवणे निता मंगलसिंग |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | जोशी अनंत हरिश्चंद्र | सोनवणे विक्रम किसन |
| चौधरी मंगला संजय | तायडे सुरेखा नितीन | भापसे जिजाबाई अण्णासाहेब |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | चव्हाण ज्योती बाळासाहेब | **स्विकृत सदस्य** |
| सोनवणे धिरज मुरलीधर | मराठे जितेंद्र भगवान | सोनवणे कैलास नारायण |
| काळे दिपमाला मनोज | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | त्रिपाठी विशाल राधेशाम |
| पाटील सचिन भिमराव | पाटील रेखा चुडामण | मराठे राजेंद्र नारायण |
| चौधरी मनोज सुरेश | सोनवणे सुरेखा सुदाम | चौधरी महेश रतन |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त श्री.शाम गोसावी, उपायुक्त श्री.प्रशांत पाटील, मुख्यलेखा परिक्षक श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी श्री.कपील पवार, सहा.आयुक्त श्री.आकाश डोईफोडे, व सहा.आयुक्त श्री.पवन पाटील तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.

**नगरसचिव :-** सन्मा सभागृहाचं या आजच्या विशेष महासभेत स्वागत आहे. सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करण्यात येते की सर्वांनी वंदे मातरमसाठी उभं राहायचे आहे.

**वंदे मातरमने सभेस सुरूवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांचे स्वागत आहे. मा.महापौर यांचे निर्देशानुसार आयोजित महासभेमध्ये सर्व सन्मा.सदस्यांचे आलेले सर्व श्रध्दांजलीचे तसेच अभिनंदनाचे प्रस्ताव घेण्यात आलेले नाहीत. सदरचे प्रस्ताव हे पुढील महासभेत घेण्याबाबत मा.महापौर महोदया यांचे निर्देश आहेत. विषय पत्रिकेवरील विषयांना सुरूवात करण्यात येत आहे.

**नगरसचिव :- विषय क्रं:-** १) दि.१६/१२/२०२० रोजी संपन्न झालेल्या ऑनलाईन (ॲपव्दारे) महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**ॲड . सौ.शुचिता हाडा :-** हॅलो

**मा.उपमहापौर :-** कुलभुषण भाऊ बोला, हॅलो

**श्री.कुलभुषण पाटील :-** विषय मंजुर आहे. आवाज येतोय का हॅलो

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** विषय मंजुर आहे. मान्य आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-** आदरणीय सुनिलभाऊ विषय मंजुर आहे का ? १ नंबरचा विषय मंजुर आहे ना सर्वानुमते आहे की काय? मा.सुनिलभाऊ महाजन

**श्री.सुनिल महाजन :-** आवाज येत नाहीये.

**नगरसचिव :-** आदरणीय रियाजभाई मान्य आहे का ?

**श्री.ईब्राहीम पटेल :-** हॅलो

**नगरसचिव :-** आदरणीय रियाजभाई विषय क्रं. १ मंजुर है क्या

**श्री.रियाज बागवान :-** मंजुर है

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर महोदय मला बोलायचे आहे, बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** ईबाभाई बोला

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर महोदय मी मागच्या वेळेला मी विषय मांडला होता ख्वॉजानगरीचा अतिक्रमणबाबत.

**मा.महापौर :-** ईबाभाई बोला

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर महोदय, नगरपालिकेवाल्यांनी जेव्हा ख्वॉजानगरीचा विषय घेतला. मागच्या मिटींगला मी आपल्याला विनंती केली की , मला बोलायचे आहे आपण मला बोलायची संधी दिली नाही

**मा.महापौर :-** ईबाभाई

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर महोदय, आप्पा , आप्पा दोन मिनिटे आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब

**मा.महापौर :-** बोला आप्पा साहेब

**श्री.ईब्राहीम पटेल :-** आप्पा दोन मिनिटे आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब मागचा कोणताही विषय या मिटींग मध्ये येणार नाही.

**मा.महापौर :-** ईबाभाई विषयाला सोडुन बोलु नका, आजचे जे विषय आहेत त्यांच्यावरच चर्चा करायची आहे .

**श्री.ईब्राहीम पटेल :-** नाही नाही आप्पा

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ विशेष सभा आहे आजची

**श्री.ईब्राहीम पटेल :-** आप्पा इतिवृत्तामध्ये मागच्या मिटींगचे हे आलेले आहे की नाही.

**मा.महापौर :-** पुढच्या सभेमध्ये विचारा ना ईबाभाई

**श्री.कैलास सोनवणे :-** पुढच्या सभेत

**मा.महापौर :-** पुढच्या महासभेत विचारा तुम्ही या वेळेस फक्त विषंयावर चर्चा करणार आहेत आपण आजची ही विशेष महासभा आहे.
**श्री.कैलास सोनवणे :-** पुढचे विषय घ्या गोराणेसाहेब

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३६३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, दि.१६/१२/२०२० रोजी संपन्न झालेल्या ऑनलाईन (ॲपव्दारे) महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | | |
|---|---|---|
| **अनुकूल मते** | **:- ६२** | **प्रतिकुल मते :- ००** |
| **सूचक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** | |
| **अनुमोदक** | **:- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ** | |

**नगरसचिव :- विषय क्रं:- २)** शिवाजी नगर मधील नविन २० सिटस शौचालय बांधकामाच्या जागेत बदल करुन नविन जागेवर दोन भागात प्रत्येकी १० सिट्स नुसार शौचालय बांधणे तसेच याकामी मंजूर रकमेत होणारी वाढ रक्कम रु.२.५० ते ३.०० लक्ष मात्रचे वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.कैलास सोनवणे :-** मंजुर आहे, मंजुर आहे.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मंजुर आहे.
**श्री.किशोर बाविस्कर :-** माझे अनुमोदन आहे या विषयाला
**श्री.दिलीप पोकळे :-** मला बोलायचे आहे.
**नगरसचिव :-** आदरणीय नितीनभाऊ मंजुर आहे का?
**श्री.नितीन लढ्ढा :-** हो मंजुर आहे.
**नगरसचिव :-** आदरणीय रियाजभाई.
**श्री.रियाज बागवान :-** हा हा मंजुर है.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३६४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, प्रभाग क्रं.०२ मधील श्री.परदेशी यांच्या घरा जवळील जुन्या सार्व शौचालये तोडुन तेथे नविन २० सिट्च्या सार्व.शौचालयाचे बांधकाम मंजुर असुन कार्यादेश क्र.८७ दि.१२/०९/२०१९ अन्वये मक्तेदार यांना कार्यादेश निर्गमित केलेले आहेत. मात्र त्या ठिकाणी नविन शौचालयाचे बांधकाम न करता या जागेच्या उत्तरेकडील मनपा मालकीच्या शिवाजी नगर हुडकोच्या जागेतुन जाणारा १२ मीटर रुंद विकास योजनेतील रस्त्याची जागा वगळुन त्या लगतच्या उर्वरीत शिल्लक असलेल्या जागेत सदर शौचालय बांधण्याकामी मनपा मालकीची जागा उपलब्ध आहे का ? व त्या ठिकाणी नविन मंजुर सार्व.शौचालय बांधकाम करता येईल किंवा कसे ? या बाबत नगररचना विभागाकडुन अहवाल मागविला असता नगररचना विभागाचे अहवालानुसार जुन्या सार्व. शौचालय हे जळगांव स.नं.३३८/३-अ या भुमिअभिन्यासातील ९.१४ मीटर रुंद रस्त्यावर असल्याचे नमुद आहे. तसेच मनपा मालकीची जागा स.नं.३३७/३-अ व ३ब LIG स्कीम (शिवाजी नगर हुडको) या भूमीअभिन्यासातील दक्षिण-पश्चिम कोपऱ्यातुन जाणाऱ्या १५ मीटर रुंद विकास योजना रस्त्यालगत असणारे अंदाजीत क्षेत्र ३१७.०० चौ.मी. शिल्लक आहेत त्या जागेत सार्व.शौचालय बांधकाम करणे बाबत आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा असे कळविले आहे. व त्यानुसार नकाशामध्ये भुमिअभिन्यासाचे मार्कींग केलेले असून त्यावर सार्व.शौचालय बांधकाम करावयाची जागा लाल रंगाने दर्शविण्यात आलेली आहे.

उक्त प्राप्त अहवाल व नकाशांचे अवलोकन केले असता शिवाजी नगर हुडको या मनपा मालकीच्या जागेतुन जाणारा वि.यो. रस्त्याच्या लगतच्या लाल रंगाने दर्शविलेल्या मोकळया जागेत नविन मंजुर असलेले सार्व.शौचालयाचे बांधकाम करता येईल मात्र उपलब्ध असलेल्या जागेत २० शिटचे शौचालयाचे एकत्रीत बांधकाम करणे शक्य नसुन त्या ऐवजी रस्त्याच्या पूर्वेकडे १० शिट् व पश्चिमेकडे १० शिट्चे सार्व.शौचालय बांधकाम करणे शक्य होईल मात्र अश्या प्रकारे दोन भागात शौचालयाचे बांधकाम करावयाचे झाल्यास त्यासाठी मंजुर रक्कम रु.२३,२२,११५/- मध्ये अंदाजे रक्कम रु.२.५० ते ०३ लक्ष रुपयांची वाढ होण्याची शक्यता असुन सदरचा वाढीव खर्च हा मनपा निधीतुन करावा लागेल.

यानुसार पूर्वीच्या सार्व. वापराच्या रस्त्यावरील सार्व.शौचालयाच्या जागेवर नविन मंजुर २० शिट्चे शौचालय न बांधता या जागेपासुन जवळच असलेल्या मनपा मालकीच्या शिवाजी नगर हुडको मधील वि.यो.रस्त्याच्या जागेलगत असलेल्या मोकळया जागेत रस्त्याच्या पुर्वेस व पश्चिमेस १०-१० शिट्च्या शौचालयाचे बांधकाम करण्यास व त्यासाठी मंजुर रक्कमेपेक्षा होणाऱ्या जादा खर्च रक्कम रु. २.५० ते ०३ लक्ष मात्र मनपा निधीतुन करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६२ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३)** शासनाच्या मुलभुत सुखसुविधा निधी अंतर्गत प्राप्त २५ कोटी निधीतील काही कामे रद्द झालेली आहेत व इतर कामातून काही निधी शिल्लक आहे एकूण शिल्लक निधीतील रक्कम रु.३.३४ कोटीतून १ ते ६ कामांची एकूण रक्कम रु.३.३४ कोटी प्रस्तावित करण्यात आलेले आहेत सदर आलेल्या कामांचा महासभेत ठराव करुन शासनाकडे प्रस्तावित करणेकामी मा.महापौर सौ.भारती कैलास सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.उपमहापौर :-** सुचितताई बोला

**मा.महापौर :-** सुचितताई बोला, बोलाना ताई

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** हॅलो महापौर महोदया या विषयासंदर्भात एक सुचना येथे करू ईच्छिते. महापौरताई

**मा.महापौर :-** बोलाना ताई

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** या विषयासंदर्भात विनंती आहे महापौरांना आणि प्रशासनाला २५ कोटीमधील ५ कोटी शिल्लक निधीमधील ही जी यादी आहे कामांची यामध्ये आपण स्त्री आणि पुरूष स्वच्छता गृहासाठी ५० लक्ष रूपये टाकलेले दिसत आहेत. येथे महापौरांना सांगु ईच्छिते की आपल्याकडे अनेक सेवाभावी संस्था हे काम फ्री ऑफ कॉस्ट करून द्यायला तयार आहेत. ही शौचालये बांधुन द्यायला तयार आहेत आणि या संदर्भातील फाईल ही आपली प्रशासनाकडे फीरते आहे. या संदर्भात माझी आयुक्तांशी सुध्दा भेट झालेली आहे. मी त्यांच्याही लक्षात आणुन दिलेले आहे.महापौर ताई

**मा.महापौर :-** आवाज येत नाहीये ताई तुमचा बोलाना ताई, कृपया करून सर्वांनी आपले माईक बंद करावेत.

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई आता येतोय का माझा आवाज

**मा.महापौर :-** आवाज येत नाहीये ताई तुमचा

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई

**मा.महापौर :-** आवाज येत नाहीये ताई तुमचा

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई

**मा.महापौर :-** हो येतोय ताई बोला

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई येतोय आता आवाज

**मा.महापौर :-** हो येतोय ताई बोला

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** या विषयासंदर्भात महापौरताई आपल्याला एक विनंती करायची आहे , की या विषयामध्ये ५० लक्ष रूपये आपण महिला आणि पुरूष स्वच्छता गृहासाठी टाकलेले दिसुन येत आहे. या विषयामध्ये मी आपल्या लक्षात आणुन देवु ईच्छिते की यासाठी महापालिकेस अनेक सेवाभावी संस्था फ्री ऑफ कॉस्ट हे स्वच्छतागृह उभारुन देण्यास तयार आहे.माझ्या सभापती पदाच्या कार्यकाळात या संदर्भातील प्रस्ताव प्रशासनाकडे पाठविण्यात आलेला आहे.मात्र प्रशासनाच्या दप्तर दिरंगाई मुळे अजुनपर्यंत यावर कोणताही निर्णय होवु शकलेला नाही. मा.आयुक्त साहेबांच्या निदर्शनास सुध्दा मी हे आणुन दिले होते की या विषयावर प्रशासनाच्या सहकार्याशिवाय हे काम मार्गी लागु शकणार नाही. होते काय आहे ताई की या कामापेक्षा ५० लक्ष रूपये दुसऱ्या कोणत्या तरी चांगल्या कामावर आपण खर्च करू शकणार आहोत. हे आपण खर्च जो याच्यावर करतो आहेत की जे आपल्याला फ्री ऑफ कॉस्ट करून देताहेत. म्हणजे काल जे स्थायीच्या सभेमध्ये आपले ज्येष्ठ सदस्य नितीनभाऊंनी सभात्याग केला. प्रशासनाचा निषेध म्हणुन तर मला सुध्दा पुन्हा एकदा प्रशासनाचा तिव्र निषेध व्यक्त करावासा वाटतो , की प्रशासनाचा.

**श्री.सचिन पाटील :-** महापौर महोदया

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** ढिम्म कारभारामुळे, प्रशासनाच्या दप्तर दिरंगाईमुळे अशाप्रकारची चांगली कामे होत नाहीत.

**श्री.सचिन पाटील :-** महापौर महोदया मला बोलायचे आहे या संबंधी महापौर ताई

**मा.महापौर :-** सचिनभाऊ त्यांचे बोलणे होवु द्या.

**श्री.सचिन पाटील :-** आपण सेवाभावी संस्थांची यादी तयार करून ती महापौरांकडे व आयुक्तांकडे द्यावी. पण महानगरपालिका ५० लक्ष चा खर्च जर करायला तयार असेल तर महापालिकेला करू द्यावी. ते पण गरजेचे आहे लोकसंख्येच्या मानाने ५० लाखांचा खर्च सेवाभावी संस्थाकडुन ते काम होणार नाही.

**मा.महापौर :-** सचिनभाऊ

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** सचिनभाऊ माझे म्हणणे पुर्ण ऐकुन घ्या.

**श्री.सचिन पाटील :-** सेवाभावी संस्थांना पण करू द्या आणि महापालिकेलापण करू द्या ना

**श्री.चेतन सनकत :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**मा.उपमहापौर :-** सचिनदादा

**श्री.सचिन पाटील :-** आतापर्यंत सेवाभावी संस्थांनी जर करायचे राहीले असते तर केव्हाचे केले असते.

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** सचिनभाऊ आधी विषय समजुन घ्या तुम्ही

**श्री.सचिन पाटील :-** ताई , महापौर ताई मला याच्यावर बोलायचे आहे.

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** या विषयावर मी प्रशासनाचा तिव्र शब्दात निषेध करते.

**श्री.सुनिल महाजन :-** परस्पर विरोधी भुमिका मांडु नका . पार्टी मिटींगमध्ये मांडायच्या भुमिका

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** या विषयावर मी प्रशासनाचा तिव्र शब्दात निषेध करत आहे प्रशासनाने याची नोंद घ्यावी.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई मला बोलायचे आहे.

**श्री.सचिन पाटील :-** सेवाभावी संस्थांकडुन काम करून घ्यावी व महापालिकेकडुनही काम करून घ्यावे ही आमची सुचना आहे. जळगांव शहराची लोकसंख्या पाहाता या चांगल्या गोष्टी केलेल्या योग्य राहतील.

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** सचिनभाऊ करायलाच हवे त्याचा प्रश्नच नाहीये कारण महापालिका वित्त आयोगातुन करते. हा जो शिल्लक निधी आहे.

**श्री.चेतन सनकत :-** मा.महापौर ताई आपण जेवढ्याही संस्था आहेत किंवा ज्यांचे अर्ज आलेले असतील त्यांनाही आणि महापालिकेच्या निधीमधुनही यांना मंजुरी देण्यात यावी जेणेकरून

**मा.महापौर :-** चेतनभाऊ आवाज येत नाहीये येथे

**श्री.चेतन सनकत :-** मा.महापौर ताई आता येतोय का आवाज

**मा.महापौर :-** हो बोला.

**श्री.चेतन सनकत :-** मा.महापौर ताई ज्या सेवाभावी संस्था तयार असतील त्यांनाही आपल्या महानगरपालिकेच्या निधीमधुनही करण्यात याव्या जेणेकरून आपल्या जळगांव शहराच्या नागरीकांची सोय होईल.

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** महापौर ताई मी आपले लक्ष वेधु ईच्छिते की,

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई

**श्री.ईब्राहीम पटेल :-** आवाज येत नाहीये महापौर ताई

**मा.महापौर :-** कुलभुषण भाऊ बोला.

**मा.उपमहापौर :-** कुलभुषण भाऊ सुचक द्या बोला.

**श्री.कुलभुषण पाटील :-** महापौर महोदया याच्यामध्ये सन्मा.सदस्यांनी ज्या सुचना सांगीतल्या त्या तर मान्यच कराव्या परंतु याच्यामध्ये उपविषय जे दोन विषय आहेत एक नंबरचा आणि तिन नंबरचा याच्यामध्ये थोडं बोलायचे आहे मला याच्यात प्रभाग क्रं. १९ मध्ये आपण फेज वायर ओढणार आहेत आणि जळगांव शहरात शिवाजी नगरच्या पुलासाठी पोल शिफ्टींग साठी आपण जे टेंडर काढणार आहेत. त्याच्यामध्ये आपण सांगीतलेले आहे की ते महावितरण कंपनीकडे वर्ग करावे . तर आमची विनंती अशी असेल की ते महावितरण कडे वर्ग न करता त्याची जी टेंडर किंवा निविदा प्रक्रीया असेल ती आपल्या महानगरपालिकेतर्फे राबविण्यात यावी. जेणेकरून आपले काम हे लवकर व सुरळीत होईल.त्याचप्रकारे जो कांचन नगरमध्ये चौघुले प्लॉट मध्ये ५० लक्ष रूपये डांबरीकरण रस्त्यासाठी टाकलेले आहेत. त्याच्यामध्ये काही ठिकाणी पाण्याचा निचरा होण्याकरीता थोडी अडचण असल्याकारणाने तो रस्ता वारंवार खराब होत असतो. तर ज्याठिकाणी पाण्याचा निचरा होत नाही त्याठिकाणी पेव्हर ब्लॉक किंवा काँक्रींटचे पॅचेस मारण्यात यावे एवढी आमची सुचना आहे.

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई मला पुन्हा एकदा बोलण्याची संधी देण्यात यावी.

**श्री.कुलभुषण पाटील :-** हा विषय मान्य आहे.

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई

**मा.उपमहापौर :-** नवनाथभाऊ अनुमोदन द्या.

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई

**मा.उपमहापौर :-** किशोरभाऊ बाविस्कर अनुमोदन द्या.

**मा.महापौर :-** किशोरभाऊ

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई

**मा.उपमहापौर :-** किशोरभाऊ

**श्री.किशोर बाविस्कर :-** मंजुर

**मा.महापौर :-** ताई तुम्ही याच विषयावर बोलणार आहात का ?

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** हो याच विषयावर मला अजुन एक गोष्ट सभागृहाच्या निदर्शनास आणुन द्यायायची आहे की ती अशी आहे ताई की आपल्या प्रशासनातील अधिकाऱ्यांना सुध्दा या सेवाभावी संस्था येवुन देखील भेटुन गेलेले आहे.आपण हवे तर उपायुक्त प्रशांत पाटील साहेबांना विचारावे की सुप्रिमवाले साहेब आठ

दिवसांपुर्वी या संदर्भात भेटुन गेलेले आहेत किंवा नाही. फ्री ऑफ कॉस्ट सेवाभावी संस्था उभारून द्यायला तयार आहे.पण प्रशासनाच्या ढिम्म कारभारामुळे हे काम होत नाहीये.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर मॅडम मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला आप्पासाहेब

**श्री.कैलास सोनवणे :-** शुचिताताईंनी जे मत मांडलेले आहे की सामाजिक संस्थांकडुन हे काम करून घ्यावे तरी त्यांच्याकडुनही करून घ्यावे आणि आता आपले पुढचे विषय सुरू करावे अशी मी आपल्याला नम्र विनंती करतो.

**मा.महापौर :-** कुलभुषणभाऊ सुचक आहे का

**श्री.सचिन पाटील :-** महापौर महोदया मला बोलायचे आहे. महापौर महोदया

**नगरसचिव :-** विषय क्रं. ३ आदरणीय सुनिलभाऊ

**मा.महापौर :-** सुनिलभाऊ

**नगरसचिव :-** आदरणीय सुनिलभाऊ सर्वानुमते मंजुर आहे का?

**श्री.सचिन पाटील :-** महापौर महोदया मला बोलायचे आहे. महापौर महोदया मला बोलायचे आहे.

**नगरसचिव :-** आदरणीय सुनिलभाऊ

**नगरसचिव :-** विषय क्रं. ३ आदरणीय सुनिलभाऊ मंजुर आहे का सर्वानुमते

**श्री.सुनिल महाजन :-** हो

**नगरसचिव :-** रियाजभाई ३ नंबर विषय मंजुर आहे ना.

**श्री.रियाज बागवान :-** हो हो.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३६५ पारित करण्यात आला.**

शासनाच्या मुलभुत सुखसुविधा निधी अंतर्गत प्राप्त २५ कोटी निधीतील काही कामे रद्द झालेली आहेत व इतर कामातून काही निधी शिल्लक आहे एकूण शिल्लक निधीतील रक्कम रु.३.३४ कोटीतून १ ते ६ कामांची एकूण रक्कम रु.३.३४ कोटी प्रस्तावित करण्यात आलेले आहेत सदर आलेल्या कामांचा महासभेत ठराव करुन शासनाकडे प्रस्तावित करणेकामी मा.महापौर सौ.भारती कैलास सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करण्यात येतो की, शासनाच्या मुलभुत सुखसुविधा निधी अंतर्गत प्राप्त रुपये २५ कोटी निधीतील काही कामे रद्द झाली आहेत व इतर कामातुन काही निधी शिल्लक राहत आहे. एकुण शिल्लक निधीची रक्कम रु.३.३४ कोटी असुन या निधीतुन खालील नमुद १ ते ६ विकास कामे करणे कामी येणारी रक्कम रु.३.३४ कोटी मात्रचे खर्चास तसेच सदर कामे सदर शिल्लक निधीतुन करणेसाठी प्रस्ताव शासनाकडेस पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | वार्ड क्रं.१९ अंतर्गत येत असलेल्या सुप्रिम कॉलनीत व आजु-बाजुच्या परिसरात अस्तित्वात असलेल्या पोलांवर स्ट्रिट लाईट फेज वायर ओढुन पथदिव्यांची व्यवस्था करणे (महावितरण कंपनीच्या १.३% सुपरव्हिजन स्किम अंतर्गत) | रु.२४.५९ लक्ष |
| २. | जळगांव शहरातील शिवाजीनगर रेल्वे उड्डाणपूलाच्या (रेल्वे लेव्हल क्रॉसिंग ४२०- | रु.१५०.०० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| | ९/११) जोडरस्त्याच्या संरेखेच्या मार्गातील उच्चदाब / लघुदाब विज वाहिनी स्थलांतरीत करणे कामे अपेक्षीत खर्च रक्कम रु.०१.५० कोटी मात्र निधी महावितरण कंपनी मर्यादीत जळगांव यांना उपलब्ध करुन देणे/ महावितरण कंपनी मर्यादीत जळगांव यांचे कडेस वर्ग करणे. | |
| ३. | प्रभाग क्रं.०२ कांचन नगर चौघुले प्लॉट परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | रु.५०.०० लक्ष |
| ४. | जळगांव शहरात आवश्यक ठिकाणी स्त्री व पुरुषांकरीता स्वच्छतागृह/युरिनल्स ची व्यवस्था करणे. | रु.५०.०० लक्ष |
| ५. | डी.मार्ट ते रामेश्वर कॉलनीतील आदित्य चौक पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | रु.४८.४१ लक्ष |
| ६. | पिंप्राळा स्मशानभुमी मध्ये दुरुस्ती, सुशोभिकरण करुन विकसित करणे. | रु.११.०० लक्ष |
| | एकुण रक्कम :- | रु.३३४.०० लक्ष |

सभागृहात सन्मा.सदस्यांनी सुचविल्यानूसार वर नमूद अ.क्रं.२ मध्ये जळगांव शहरातील शिवाजीनगर रेल्वे उड्डाणपूलाच्या (रेल्वे लेव्हल क्रॉसिंग ४२०-९/११) जोडरस्त्याच्या संरेखेच्या मार्गातील उच्चदाब / लघुदाब विज वाहिनी स्थलांतरीत करण्याचे काम हे महावितरण कंपनीकडून न करता सदर कामी मनपा प्रशासनाने निविदा प्रक्रिया राबवुन महानगरपालिकेमार्फत काम करणेस तसेच उपरोक्त अ.क्रं.३, मधील प्रभाग क्रं.०२ कांचन नगर चौघुले प्लॉट परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे ऐवजी ज्याठिकाणी पाण्याचा निचरा होत नाही त्याठिकाणी पेव्हर ब्लॉक बसवुन अथवा क्रॉक्रींटीकरण करुन रस्ते बनविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच जळगांव शहरात आवश्यक त्याठिकाणी स्त्री व पुरुषांकरीता स्वच्छतागृह/युरिनल्स ची व्यवस्था करणे कामी प्रशासनाकडेस ज्या काही सेवाभावी संस्थांचे प्रस्ताव आलेले असतील त्यांचेकडून सुध्दा काम करुन घेणेस याव्दारे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६२ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**
**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४)** महासभा ठराव क्र.१८२ दि.०३/०८/२०१९ अन्वये गठित ११ समित्या बरखास्त करणेस व नव्याने एक वर्षासाठी ११ समित्या गठीत करण्याची प्रक्रिया सुरु करणेबाबत कार्यवाही करणे संदर्भात मा.सभापती, स्थायी समिती, श्री.राजेंद्र झिपरु पाटील व इतर ६ सन्मा.सदस्य, यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.उपमहापौर :-** राजेंद्र पाटील, सभापती साहेब, राजेंद्र घुगे पाटील.
**श्री.चेतन सनकत :-** विषय मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** राजेंद्र पाटील, अनुमोदक,

**मा.महापौर :-** राजु भाऊ,
**श्री.राजेंद्र पाटील :-** आवाज येत आहे का माझा ?
**मा.महापौर :-** हो येत आहे.
**श्री.राजेंद्र पाटील :-** गठीत करण्यात आलेल्या ११ समित्यांना वर्षाच्या वर कालावधी झालेला असल्याने बरखास्त करण्यात येत आहे. तसेच कामकाजात सुसुत्रता आणण्यासाठी महासभा ठराव क्र.१८३ दि.०३/०८/२०१९ मध्ये नमुद ११ समित्या १ वर्षासाठी पक्षीय बलाबलनुसार ७ सदस्य समिती गठीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात यावी. सदर समित्यांचे सचिव हे संबंधीत विभागाचे विभाग प्रमुख हे असतील. विषय मंजुर.
**नगरसचिव :-** आदरणीय सुनिल भाऊ मंजुर का सर्वानुमते,
**श्री.सुनिल महाजन :-** हो.
**नगरसचिव :-** रियाजभाई
**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** रियाज भाई.
**श्री.रियाज बागवान :-** हो मंजुर. ओके.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३६६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेत महासभा ठराव क्रं.१६६ दि.०६/०६/२०१९ व महासभा ठराव क्र.१८२ दि.०३/०८/२०१९ अन्वये १) बांधकाम समिती, २) अतिक्रमण समिती, ३) स्वच्छता समिती, ४) पाणी पुरवठा समिती, ५) दवाखाना समिती, ६) नियोजन समिती, ७)आस्थापना समिती, ८) विधी समिती, ९) वाहन व्यवस्था समिती, १०) शिक्षण समिती, ११) विदयुत समिती, या ११ विशेष समित्या गठित करण्यात आलेल्या होत्या. सदर समित्यांचा एक वर्षाचा कालावधी संपलेला असल्यामुळे सदरच्या समित्या याव्दारे बरखास्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.

तसेच जळगांव शहर महानगरपालिकेच्या कामकाजात सुसुत्रता आणणेसाठी खालीलप्रमाणे ७ (सात) सदस्यीस ११ विशेष समित्या एक वर्षासाठी गठीत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. १) बांधकाम समिती, २) अतिक्रमण समिती, ३) स्वच्छता समिती, ४) पाणी पुरवठा समिती, ५) दवाखाना समिती, ६) नियोजन समिती, ७)आस्थापना समिती, ८) विधी समिती, ९) वाहन व्यवस्था समिती, १०) शिक्षण समिती, ११) विदयुत समिती सदर प्रत्येक समितीमध्ये भारतीय जनता पार्टीचे पाच सदस्य, शिवसेना दोन सदस्य याप्रमाणे सात सदस्यीस समितीस पक्षीय बलाबल नूसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० व ३१ मधील तरतूदीनूसार मान्यता देण्यात येत आहे.

उपरोक्त सर्व विशेष समितींचे कामकाज हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० व ३१ मधिल तरतूदीनुसार चालेल. सदर समितीचे सचिव हे संबंधित विभागांचे विभाग प्रमुख हे असतील उपरोक्त कलमातील तरतूदीनुसार समितींच्या बैठकीचे सर्व अभिलेखे संबंधित विभागाचे विभागप्रमुख (सचिव) यांनी ठेवून त्यांनी त्याचे जतन करणे आवश्यक राहील.व प्रत्येक विशेष समितीचे सर्व कामकाज महानगरपालिकेकडुन कायम केले जाण्याच्या अधिन असेल.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६२ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पाटील राजेंद्र झिपरु**
**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**श्री.कुलभुषण पाटील :-** मा.महापौर महोदया, संबंधीत विषय मान्य.

**श्री.धरज सोनवणे :-** नेटला प्रॉब्लम येत आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मा.महापौर महोदया,

**मा.महापौर :-** विषय क्र.५ मधील, शांतता राखावी.

**श्री.कुलभुषण पाटील :-** हॅलो, हॅलो, हॅलो. गोराणे साहेब, हॅलो. मा.महापौर महोदया, गोराणे साहेब. रियाज भाई माईक बंद कर दो रियाज भाई. गोराणे साहेब कोणता विषय चालु आहे.

भाजपा व शिवसेना पक्षाचे काही सन्मा.सदस्य सभागृहात आले व ऑफलाईन सभा घेणेबाबत मागणी केली.

**मा.महापौर :-** आवाज येत नाहीये कुणाचाच.

**नगरसचिव :**- सुनिल भाऊ, सुनिल भाऊ.

**श्री.जितेंद्र मराठे :-** गोराणे साहेब, विषय कुठला चालु आहे

**नगरसचिव :**- ईबाभाई.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर महोदया ऑनलाईन आहे की काय आहे काहीच समजत नाहीये.

**श्री.सुनिल महाजन :-** पार्टी मिटींगमध्ये घेत जा तुम्ही आम्हाला काहीच समजत नाहीये आवाज पण येत नाहीये. काही विषय मांडता येत नाहीये. सभापती , स्थायी समिती सुध्दा सांगताहेत की यांनी प्रस्ताव दिला .

**श्री.ईब्राहीम पटेल :-** कोण काय बोलतय काहीच समजत नाही.

**श्री.अनंत जोशी :-** महापौरताई एक विनंती आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** आवाज येत नाहीये साहेब.

**श्री.अनंत जोशी :-** आयुक्त सर

**श्री.ईब्राहीम पटेल :-** डायरेक्ट सभा घ्याना तुम्ही

**श्री.अनंत जोशी :-** आयुक्त सर इतक्या महासभा झाल्या एकही महासभामध्ये काय चाललय काहीच समजत नाही आणि आपणही काही . . .

**श्री.ईब्राहीम पटेल :-** काहीच समजत नाही.

**श्री.प्रशांत नाईक :-** पार्टी मिटींगमध्ये ठरलेले विषय आहेत ते येथे मांडताहेत

**श्री.अनंत जोशी :-** गोराणे साहेब मी तुम्हाला मागेही सांगीतले होते की अनेक महापालिकेत महासभा ऑफलाईन झाल्या आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** हे प्रस्ताव तुमच्याकडुनच आलेले आहेत ना मग पार्टी मिटींग कशाकरीता झाली.

**श्री.अनंत जोशी :-** जेवढ्या महासभा ऑनलाईन झाल्या काही विषय समजत नाही. काहीच ऐकायला येत नाही.विषयावर बोलताही येत नाही.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** सर्व जळगांव परेशान आहे, सगळयाकडे खड्डे पडलेले आहेत. लोकांच्या आरोग्याचे प्रश्न आहेत.

**नगरसचिव:**- १७ व्या माळयावर स्पिकर चालु नाहीये का?

**श्री.अनंत जोशी :-** सर्वात आधी हा निर्णय घ्या की सभा ऑनलाईन सभा बंद करा.

**श्री.सुनिल महाजन :-** हो सभा ऑनलाईन घेणे बंद करा. आता बस झाले , आमचे म्हणणेच मांडले जात नाहीये. त्यांचे त्यांचे भांडणं इतके आहेत की आमचा नंबरच येत नाही.

**श्री.अनंत जोशी :-** या कोविड मुळे आम्ही आतापर्यंत समजुन घेत होतो पण ईतक्या महासभा ज्या झाल्या ऑनलाईन एकाही विषयासंदर्भात आम्हाला मांडता येत नाही. गोराणेसाहेब तुम्ही माहिती का घेत नाही ज्या ठिकाणी महासभा झाल्या. त्या ठिकाणी कश्या झाल्या.

**नगरसचिव :**- मा.अनंतभाऊ महासभा या सगळया ऑनलाईनच झालेल्या आहेत.

**श्री.अनंत जोशी :-** सर ऑफलाईन महासभा झालेल्या आहेत.तुम्ही माहिती घ्या नाहीतर मी आणुन देतो माहिती.

**मा.महापौर :-** चला बसा आता सभागृहात.

मा.महापौर यांचे निर्देशानुसार शिवसेनेचे सन्मा.सदस्य म.न.पा. सभागृहात बसले

**श्री.सुनिल महाजन :-** धन्यवाद , धन्यवाद , चला बसा येथेच

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५)** शासनाच्या नगरोत्थान व दलितेत्तर निधी अंतर्गत (सा.बा.विभाग १० कोटी मधील) मनपा प्रभागनिहाय यादीतील अ. क्रं. १ ते ७१ चे कामे करणेस व त्याकामी येणारा रक्कम रु.९,९९,६९,८४०/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.महापौर यांचे जा.क्रं./जशमनपा/म.का./१३८/२०२०-२१ दि.२७/०१/२०२१ चे पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

सन्मा.सदस्य श्री.कैलास सोनवणे सभागृहात आले.

**श्री.प्रशांत नाईक :-** आप्पा काय चाललय काहीच समजत नाहीये. चार जण बोलतात तर काहीच समजत नाही आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** ते करणाऱ्यांना समजायला पाहीजे ना.

**श्री.सुनिल महाजन :-** आप्पा काय चालु आहे काहीच आवाज येत नाहीये.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मा.महापौर महोदया

**श्री.कैलास सोनवणे :-** आमचे सदस्य अति हुशार आहेत.

**श्री.सुनिल महाजन :-** आप्पा दोन मिनिटं ऐकुन तर घ्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** आमचे सर्व सदस्य अतिहुशार आहेत. काय म्हणण आहे, त्यांना लाभ मिळत आहे. आमची पार्टी कार्यवाही करीन त्यांच्यावरती.

**श्री.प्रशांत नाईक :-** काही कार्यवाही करणार नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुला काय करायचे आहे काय कार्यवाही करतील, झाल नां आता

**श्री.प्रशांत नाईक :-** आप्पा काहीच आवाज येत नाही ना

**मा.महापौर :-** चेतनभाऊ, चेतनभाऊ, चेतनभाऊला आवाज द्या.

**मा.उपमहापौर :-** चेतनभाऊ.

**श्री.सुनिल महाजन :-** आप्पा दोन मिनिटं

**श्री.ईब्राहीम पटेल :-** काय बोलत आहे काहीच समजत नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही पण काय बोलत आहे ते पण आम्हाला समजत नाहीये.

**मा.महापौर :-** आप्पा साहेब तुम्ही वर जा ना

**श्री.प्रशांत नाईक :-** आप्पा तुम्ही जा वर आता महापौरा मॅडमांनी सांगीतले आहे.

**श्री.किशोर बाविस्कर :-** महापौर साहेब नेट चालत नाहीये.

**श्री.चेतन सनकत :-** काहीच चालत नाहीये.

**श्री.सचिन पाटील :-** काहीच नेट चालू नाहीये महापौर ताई

**श्री.कैलास सोनवणे :-** मी तुम्हाला अगोदरच सांगीतले की हे तुम्ही ऑनलाईनचे हे क्लियर करा. व्यवस्थीत करा, सभा ऑफलाईन घ्या कारण की सर्वांना बोलता येईल.

**नगरसचिव :-** नाही, नाही, महासभेला अजुन रितसर परवानगी नाही हे सर ही सांगतील.

**श्री.कैलास सोनवणे :-** ते नाही सांगत आहे मी जे तुम्ही ऑनलाईन घेत आहेत ना ते व्यवस्थित करत नाहीये.यंत्रणा व्यवस्थित नाहीये.

**नगरसचिव :-** व्यवस्था व्यवस्थित केलेली आहे. ही तर सिस्टिम आहे ना.

**श्री.चेतन सनकत :-** आम्हाला येथे काय सुरु आहे, काहीच समजत नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** अहो साहेब

**श्री.सुनिल महाजन :-** काहीच समजत नाही आयुक्त साहेब

**श्री.चेतन सनकत :-** काय चाललय काहीच समजत नाही.

**नगरसचिव :-** अप्पा वरती ३-४ लोकांचे माईक चालु होते. म्हणुन आवाज येत नव्हता.

**श्री.कैलास सोनवणे :-** ठिक आहे, ठिक आहे आपण आहे ना आयुक्त साहेब पुढची सभा आपण संभाजी राजे मध्ये घेऊ. आपला किती मोठा प्रोग्राम झाला. तुम्ही पण होते त्या ठिकाणी. ते परवानगी देवु शकतात मग आपल कामकाज किंवा ठराव बेकायदेशीर ठरणार आहे का?

**श्री.अनंत जोशी :-** अख्ख्या देशामध्ये सगळ सुरू झालय.

**श्री.कैलास सोनवणे :-** घ्यायची पुढची सभा.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** शाळा सुध्दा सुरू झाल्या आता काय राहीले आहे.

**मा.आयुक्त :-** आपण महासभेच्या आगोदर शासनाला याच्याबद्दल कळवुन टाकु

**श्री.कैलास सोनवणे :-** ठिक आहे.

**नगरसचिव :-** १७ पत्र दिलेले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** बंटी, १७ पत्र दिलेले आहे. ऑफलाईन बैठक घेणेसाठी.

**श्री.अनंत जोशी :-** अप्पा साहेब, आकोल्यात झाली, पुण्याला झाली, नाशिकला झाली. मी आणुन देतो ना तुम्हाला माहिती.

**श्री.कैलास सोनवणे :-** चला आपण माहितीसाठी पाठवुन करुन घेऊ.

**मा.आयुक्त :-** बंटी भाऊ, आता जर जास्त गोंधळ होत असेल ना, तर तुमचे काही ठराविक पदाधिकारी सभागृहात बसवा.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी बोललो होतो मागे यांना की, ठराविक लोकांना बसवा.

**नगरसचिव :-** मी नाही बसवु शकत ना अप्पा, मी कसे काय बसवु.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी बोललो होतो मागे, तुम्ही नाही म्हणत होते.

**मा.आयुक्त :-** सभागृह नेते , विरोधी पक्षनेते, गटनेते आणि कोणाला तुम्हाला वाटत असेल त्यांना बसवा.

**श्री.प्रशांत नाईक :-** हे महापौरांना अधिकार आहे ते कोणाला बसु देता, बाकीच्यांना बाहेर काढतील ते.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुमची तरतूद आहे ना तशी शिक्षाची तर करा शिक्षा.

**श्री.सुनिल महाजन :-** आप्पा ३ नंबरचा विषय आला आहे ना, आम्ही प्रस्ताव दिलेले आहे शिवसेनेच्या नगरसेवकांचे, ते ह्या मिटींगमध्ये घेतलेले नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** कोणाचेच घेतलेले नाही. त्यासाठी वेगळी मिटींग होईल ना.

**श्री.सुनिल महाजन :-** केव्हा होईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** लगेच होईल ना. आपण ७-८ दिवसात काढु. ३ मिटींग होणार आहे या दोन महिन्यात.

**मा.महापौर :-** बसा जागेवर

**नगरसचिव :-** भाऊ मोबाईल ऑन करा.

**मा.महापौर :-** विषय क्र.५

**नगरसचिव :-** आदरणीय सुनिल भाऊ, विषय क्र. ५

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई, गोराणे साहेब, विषय क्र.५ वर बोलायच आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.५

**श्री.जितेंद्र मराठे :-** नगरसचिव साहेब पहिले आम्हाला सांगा की, काय विषय चालू आहे.

**नगरसचिव :-** आदरणीय रियाजभाई , ईबाभाई

**श्री.कुलभुषण पाटील :-** पहिले आम्हाला सांगा की, कोणत्या नंबरचा विषय चालु आहे आणि कुठला विषय चालु आहे. नगरसचिव साहेब.

**मा.महापौर :-** नगरसचिव, विषय क्र.५, यादीतील अ.क्र.१ ते ७१ कामामधील नंबर १७, प्रभाग ४ व ५ अंतर्गत पांजरापोळ ते दधीची चौक व दधीची चौक ते टॉवरचौक पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणेसाठी अंदाजित रक्कम रु. १० लक्ष मात्र दर्शविण्यात आलेले आहे. परंतु सदरची रक्कम १० लक्ष नसुन ती नजरचुकीने दर्शविण्यात आलेली असून मुळात ती रक्कम १ कोटी अशी आहे. तरी रक्कम रु.१० लक्ष ऐवजी रक्कम रु.१ कोटी मात्र दर्शविण्यात यावी व तशी यादीमध्ये दुरूस्ती करून ठराव पारीत करण्यात यावा.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई मला बोलायच आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर ताई मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** तसेच विरोधीपक्ष नेते व सन्मा.सदस्य यांच्या मागणीनुसार अ.क्र.१ ते ७१ कामांच्या यादीत खालील प्रमाणे ३ कामे समाविष्ट करून त्याप्रमाणे ठराव पारित करण्यात यावा.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर ताई मला बोलायचे आहे.

**मा.उपमहापौर:-** ईबाभाऊ थांबा थोडंस ताईंना बोलु द्या .

**मा.महापौर :-** १) प्रभाग क्र.१२ मधील गजानन हाऊसींग सोसायटी मधील श्री. किशोर ढाके यांच्या घरापासुन ते शिव रोड पार्वती नगर अजिंठा चौक हाऊसींग सोसायटी मधील पी.ई. पाटील यांच्या कॉलेज पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे रु.२२,८४,०४८/- मात्र, २) प्रभाग क्र.१२ अजिंठा हाऊसींग सोसायटी मधील ओपन स्पेस समोरील उताराचा रस्ता काँक्रीटचा करणे रु .७,२७,१९७/- मात्र ३) प्रभाग क्र.१५ मेहरूण गावठान अंतर्गत बुरूजापासुन ते महादेव मंदिरापर्यंत व्हाया मेहरूण स्मशानभुमी पर्यंत तसेच जयदुर्गा पतपेढीपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. रु. ४० लक्ष, यादीतील १ ते ७१ कामांमध्ये उपरोक्त ३ कामांचा समावेश करून सोबतच्या अ.क्र.१ ते ७४ कामे याची एकुण रक्कम १०,६९,६७,०२९/- मात्र याप्रमाणे ठराव महासभेत पारीत करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** कुलभुषण भाऊ सुचक आहात तुम्ही.

**श्री.कुलभुषण पाटील :-** याच्यामध्ये ३८ नंबरचा विषय आहे. प्रभाग क्र.१३ मधील

**मा.महापौर :-** कुलभुषण भाऊ, आवाज येत नाही.

**श्री.कुलभषण पाटील :-** आता येत आहे का आवाज,

**मा.महापौर :-** आता येत आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** याच्यामध्ये ३८ नंबरचा जो विषय आहे. नेहरु नगरमध्ये जॉगींग ट्रॅक करणे, तो आहे रु.९,९८,६०३/- तो ७ लाख रुपयांचा आहे आणि प्रभाग क्र.१३ नेहरु नगर सर्व्हे नं. ४१५ रस्ते डांबरीकरण करणे हा १३ लक्षचा आहे.

**मा.महापौर :-** काय म्हणत आहे.

**श्री.कुलभषण पाटील :-** याच्यामध्ये जे ३९ नंबरचा जो इस्टीमेट आहे हे ९,९८,०००/- चा आहे, तर हे इस्टीमेट १० लक्ष रूपयांचा आहे तर ते ९ लक्षाचा आहे ते ७ लक्षचा करायच आहे आणि जे १० लक्षचा आहे ते १३ लक्ष चा करायचा आहे.

**मा.महापौर :-** १३ लक्षचा करायच आहे असे काही तरी म्हटले ते.

**मा.उपमहापौर :-** दुरुस्ती करुन घेऊ, प्रस्ताव मान्य आहे का ?

**श्री.कुलभुषण पाटील :-** हो प्रस्ताव मान्य आहे.

**मा.उपमहापौर :-** अनुमोदक कोण ?

**श्री.धिरज सोनवणे :-** अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-** आदरणीय सुनिल भाऊ,

**श्री.सुनिल महाजन :-** हो

**नगरसचिव :-** रियाज भाई, सर्वानुमते आहे का ?

**श्री.रियाज बागवान :-** होय.

**मा.महापौर :-** पुढचा विषय घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३६७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महापौर यांचे पत्र व सभागृहात सुचविल्यानूसार सन २०२०-२१ च्या आर्थिक वर्षासाठी शासनाच्या नगरोत्थान व दलितेत्तर निधी अंतर्गत (सा.बा.विभाग १० कोटी मधील) मनपा प्रभागनिहाय खाली नमूद केलेल्या यादीतील अ. क्रं. १ ते ७१ चे कामांमधील अ.नं.१३, मधिल प्रभाग क्र.०४ व ०५ अंतर्गत पांझरापोळ ते दधीची चौक व दधीची चौक ते टॉवर पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणेसाठी अंदाजित

रक्कम रुपये १०,००,०००/- (दहा लक्ष) मात्र नजर चुकीने दर्शविण्यात आलेली आहे त्याऐवजी सदरची रक्कम ही रुपये १,००,००,०००/- (एक कोटी) करणेस व कामांच्या यादीमध्ये ज्या दुरुस्त्या झालेल्या असतील त्या दुरुस्त्या करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच महापौर यांनी सभागृहात सुचविल्यानूसार व विरोधी पक्षनेते तसेच सन्मा.सदस्य यांनी सभागृहात केलेल्या मागणी नुसार अ.नं. १ ते ७१ च्या कामांच्या यादीतील रक्कमांमध्ये दुरुस्ती करणेस तसेच अ.नं.७२,७३ व ७४ च्या कामांचा यादीत समावेश करणेस व अ.नं. १ ते ७४ ची कामे करणे कामी येणारा एकुण रक्कम रु.१०,६९,६७,०२९/- मात्र चे खर्चास तसेच सदर कामांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी,जळगांव यांचेकडेस मान्यतेकरिता पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रशासनाने सदरचा प्रस्ताव २४ तासामध्ये तयार करुन जिल्हाधिकारी,जळगांव यांचेकडेस मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही करावी.

(नगरोत्थान व दलितेत्तर निधी अंतर्गत प्रस्तावित कामे)

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजीत रक्कम रु. |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्र.०१ अंतर्गत जनाई नगर स.नं.३००/२ब/१ मध्ये आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु.२०,००,०००/- |
| २. | प्रभाग क्र.०१ अंतर्गत राधाकृष्ण नगर स.नं.३००/१+३००/२ मध्ये आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु.१०,००,०००/- |
| ३. | प्रभाग क्र.०१ मधील स.नं.३४४/१ जळगांव शिवार श्री.नंदु पुरोहीत ते मुरली महाजन यांचे घरापर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु.१०,००,०००/- |
| ४. | प्रभाग क्र.०२ स.नं.३३७/४ मधील श्री.सुकदेव भंडगर ते सतिष कंडारे यांचे घरापर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु.१०,००,०००/- |
| ५. | प्रभाग क्र.०२ मध्ये चौघुले प्लॉट परिसरातील रस्ते व असोदा रोडकडे जाणारा रस्ता पेव्हींग ब्लॉक बसवुन तयार करणे. | रु.२०,००,०००/- |
| ६. | प्रभाग क्र.०२ मध्ये शिवाजी नगर हमालवाडा व हुडको परिसरात ठिक ठिकाणी आर.सी.सी. गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु.१०,००,०००/- |
| ७. | प्रभाग क्र.०४ मध्ये चौबे शाळेच्या खुल्या जागेवर पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु.१०,००,०००/- |
| ८. | प्रभाग क्र.०४ अंतर्गत जोशी पेठ मधील श्रीराम प्रोव्हीजन जवळ रस्ता पेव्हींग ब्लॉक बसवुन तयार करणे. | रु.१०,००,०००/- |
| ९. | प्रभाग क्र.०४ अंतर्गत रिधुरवाडयातील रस्ते पेव्हींग ब्लॉक बसवुन तयार करणे. | रु.१०,००,०००/- |
| १०. | प्रभाग क्र.०४ मधील दालफळ परिसरातील रस्तेच पेव्हींग ब्लॉक बसवुन तयार करणे. | रु.१०,००,०००/- |
| ११. | प्रभाग क्र.०४ मधील बालाजीपेठ, मारवाडी गल्ली व इतर परिसरातील रस्ते पेव्हींग ब्लॉक बसवुन तयार करणे. | रु.२०,००,०००/- |
| १२. | प्रभाग क्र.०४ ओकनगर परिसरात पेव्हींग ब्लॉक बसवुन तयार करणे. | रु.१०,००,०००/- |
| १३. | प्रभाग क्र.०४ व ०५ अंतर्गत पांझरापोळ ते दधीची चौक व दधीची चौक ते टॉवर पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,००,००,०००/- |
| १४. | प्रभाग क्र.०५ अंतर्गत वानखेडे सोसायटी परिसरातील रस्ते व सिव्हील हॉस्पिटल गेट नं.०२ समोरील वानखेडे सोसायटी पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.४०,००,०००/- |
| १५. | प्रभाग क्र.०५ व ०६ अंतर्गत हौसिंग सोसायटी मध्ये ठिकठिकाणी आर.सी.सी. गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु.१९,००,०००/- |
| १६. | प्रभाग क्र.०३ जळगांव ११९/१ व तळेले कॉलनीत गटार बांधणे. | रु.१०,००,३७३/- |
| १७. | प्रभाग क्र.०३ वाल्मीक नगर बगीच्या ओपन जीम तयार करणे. | रु. ९,५२,५७१/- |
| १८. | प्रभाग क्र.०३ खेडी आंबेडकर नगर भागात आर.सी.सी.गटार बांधणे. | रु.१०,००,३७३/- |

| | | |
|---|---|---|
| १९. | प्रभाग क्र.०३ स.नं.६२ विठोबा नगर मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे. | रु.१०,००,३७३/- |
| २०. | प्रभाग क्र.१७ आयोध्या नगर स.नं.१४१,१३९,३८ मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे. | रु.३९,८६,६२५/- |
| २१. | प्रभाग क्र.१६ स.नं.५१८ रणछोडदास नगर मध्ये डांबरी रस्ते करणे. | रु.१९,७२,६७३/- |
| २२. | प्रभाग क्र.१६ स.नं.५१८ रणछोडदास नगर मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे. | रु.१०,००,३७३/- |
| २३. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी नेत्रज्योती दवाखान्या जवळ रस्ता डांबरी करणे. | रु. ९,९६,९२४/- |
| २४. | प्रभाग क्र.१० पिंप्राळा हुडको मधील बौध्द वसाहत येथे कॉंक्रीट पाथवे तयार करणे. | रु.१०,००,०००/- |
| २५. | प्रभाग क्र.१० पिंप्राळा हुडको मधील बिल्डींग नं.०१ ते बिल्डींग नं.२६ पर्यंत आर.सी.सी.गटार व रोड क्रॉसिंग ठिकाणी स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु. ९,९९,४०५/- |
| २६. | प्रभाग क्र.१० खंडेराव नगर येथे आर.सी.सी.गटार व रोड क्रॉसिंग ठिकाणी स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु.१९,९८,८१०/- |
| २७. | प्रभाग क्र.११ गट नं.१६२/१ब पिंप्राळा शिवार मधील ओपनस्पेसला चेनलींक फेन्सींग करणे. | रु. ७,८९,९५४/- |
| २८. | प्रभाग क्र.११ म्युनिसिपल कॉलनी श्री.मारोती मंदिर ते सार्व.शौचालय पर्यंत आर.सी.सी.गटार बांधणे व रोड क्रॉसिंग ठिकाणी स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु.१२,०८,३९१/- |
| २९. | प्रभाग क्र.११ हरिविठ्ठल नगर मधील मराठी मनपा शाळे समोरील विश्वकर्मा मंदिर रस्त्याच्या बाजुस आर.सी.सी.गटार बांधणे व रोड क्रॉसिंग स्लॅब टाकणे. | रु. ९,९९,४०५/- |
| ३०. | प्रभाग क्र.११ हरिविठ्ठल नगर मधील श्री.हनुमान मंदिर व गणपती मंदिरा समोरील रस्त्याच्या बाजुस आर.सी.सी.गटार व रोड क्रॉसिंग स्लॅब टाकणे. | रु. ९,९९,४०५/- |
| ३१. | प्रभाग क्र.११ मधील लेवा समाज मुलींची वस्तीगृह गल्ली लगत असणाऱ्या रोडला कॉंक्रीटी करण करणे. | रु.१५,००,०००/- |
| ३२. | प्रभाग क्र.१२ धांडे कोचिंग क्लासेस टेलिफोन नगर पश्चिम ते चर्च रोड पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२०,००,०००/- |
| ३३. | प्रभाग क्र.१२ मधील मेहरुण स.नं.५६१/२अ धांडे नगर मधील प्लॉट नं.२५ ते ३६ पर्यंतचा उताराचा रस्ता कॉंक्रीटचा करणे. | रु.१०,२५,८९४/- |
| ३४. | प्रभाग क्र.१२ मधिल जयनगर मधिल श्री.छबीलभाई शहा यांचे घरापासून ते एल.एच.पाटील यांचे घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु. ३,२७,६६७/- |
| ३५. | प्रभाग क्र.१२ मधिल अॅड.निकम यांचे घरापासून रामदास कॉलनी नाल्यापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु. ६,७२,३३२/- |
| ३६. | प्रभाग क्र.१३ मोहन नगर मेहरुण स.नं.४४९ मधील प्लॉट नं.९६ ते ११५ पर्यंत रोड डांबरीकरण करणे. | रु. ९,९९,५९८/- |
| ३७. | प्रभाग क्र.१३ मधील दौलत नगर मधील मेहरुण स.नं.४५० मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.१०,००,०५४/- |
| ३८. | प्रभाग क्र.१३ मधील नेहरु नगर मधील मेहरुण स.नं.४१५ ओपनस्पेस मध्ये जॉगींग ट्रॅक तयार करणे. | रु. ७,००,०००/- |
| ३९. | प्रभाग क्र.१३ नेहरु नगर स.नं.४१५ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.१२,९८,६०३/- |
| ४०. | प्रभाग क्र.१४ मध्ये तुळजामाता नगर, रामेश्वर कॉलनी मध्ये ठिकठिकाणी रोड क्रॉसिंग कल्व्हर्ट बांधणे. | रु. २,९६,३७६/- |
| ४१. | प्रभाग क्र.१४ मध्ये रामेश्वर कॉलनी राज शाळे पासुन इंद्रप्रस्थ चौकापर्यंत नाल्याला रिटेनिंग वॉल व रोड क्रॉसिंग कल्व्हर्ट बांधणे. | रु.१७,०२,८७८/- |
| ४२. | प्रभाग क्र.१४ मध्ये शिरसोली नाका, तांबापुरा चौक ते लक्ष्मी हार्डवेअर हायवे पर्यंत रोड साईडने गटार बांधुन रोड क्रॉसिंगला स्लॅब बांधणे. | रु. ९,९९,९१३/- |
| ४३. | प्रभाग क्र.१४ मध्ये रामेश्वर कॉलनी मध्ये बालाजी किराणा, एकनाथ नगर इ.ठिकाणी रोड क्रॉसिंग कल्व्हर्ट बांधणे. | रु. २,९६,३७६/- |

| | | |
|---|---|---|
| ४४. | प्रभाग क्र.१४ मध्ये मेहरुण नाथ स्मशानभुमी लगत गटार बांधुन रोड क्रॉसिंग स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु. ४,५१,२७३/- |
| ४५. | प्रभाग क्र.१४ अंतर्गत रामेश्वर कॉलनीतुन तलाव चौपाटीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील नाल्यावर पुल बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ४६. | प्रभाग क्र.१४ अंतर्गत एकनाथ नगर ते सिंध्दात नगर या दोन्ही जोडणाऱ्या रस्त्यावरील नाल्यावर पुल बांधणे. | रु.१५,००,०००/- |
| ४७. | प्रभाग क्र.१४ भोई गल्ली, तुळजामाता नगर, शिवाजी चौक, महाजन नगर, गणपती नगर, एकनाथ नगर इ,ठिकाणी रोड क्रॉसिंग कल्व्हर्ट बांधणे. | रु. २,५१,९२७/- |
| ४८. | प्रभाग क्र.०६ अंतर्गत केमीस्ट हॉल, गणेश नगर जवळील रस्ते डांबरीकरण करणे. | रु. ९,९६,९२४/- |
| ४९. | प्रभाग क्र.०६ अंतर्गत जळगांव स.नं.२७४/अ/६/४ प्लॉट नं.०६ ते स.नं.२७४/अ/६/१ प्लॉट नं.०५ दत्त कॉलनी येथील रस्ते डांबरी करणे. | रु. ९,९९,८९९/- |
| ५०. | प्रभाग क्र.०६ अंतर्गत दत्त कॉलनी येथील डॉ.अशोक पाटील यांचे घराजवळ, शिवशक्ती कार बाजार मागील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु. ८,४५,१७९/- |
| ५१. | प्रभाग क्र.०६ अंतर्गत पंडीत हॉस्पिटल, दिनानाथ वाडी येथे आर.सी.सी. गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु. २,३९,४००/- |
| ५२. | प्रभाग क्र.०६ अंतर्गत तुकारामवाडी वहिवाटीत येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे. | रु.१०,००,०००/- |
| ५३. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत गंधर्व कॉलनी येथील खुल्या जागेमध्ये पाथवे तयार करणे. | रु.१०,००,०००/- |
| ५४. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत गजानन कॉलनी येथील खुल्या जागेमध्ये पाथवे तयार करणे. | रु.१०,००,०००/- |
| ५५. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत भगिरथ कॉलनी व श्रीकृष्ण कॉलनी येथील खुल्या जागेस चेनलींग फेन्सींग करणे. | रु.१०,००,०००/- |
| ५६. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत पिंप्राळा गट नं.५६ मारुती पार्क येथील खुल्या जागेस चेनलींग फेन्सींग करणे. | रु.१०,००,०००/- |
| ५७. | प्रभाग क्र.०७ मधील डेमला कॉलनी येथील नाल्यावर स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु. ५,००,०००/- |
| ५८. | प्रभाग क्र.०८ स.नं.२९० हर्षगीरी अपार्टमेंट, श्रीराम कॉलनी व वाघुळदे नगर मध्ये आर.सी.सी. गटार बांधणे. | रु. ९,९९,८६६/- |
| ५९. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत अनंत कॉलनी, श्रीराम नगर परिसरात गटार बांधणे. | रु. ४,१७,२६३/- |
| ६०. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत पेट्रोलपंप मागे डॉ.खैरनार यांचे घरा समोरील रस्ता डांबरीकरण करणे. | रु. ५,९५,९८९/- |
| ६१. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत पवार पार्क व परिसरात गटार बांधणे. | रु. ९,९९,८००/- |
| ६२. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत शिवराज अपार्टमेंट गुजराल पेट्रोलपंपा मागील भाग व परीसरात गटार बांधणे. | रु. ९,९६,०००/- |
| ६३. | प्रभाग क्र.०८ निमखेडी गावठाण भागात आर.सी.सी.गटार बांधणे. | रु.२०,००,०००/- |
| ६४. | प्रभाग क्र.०९ मुक्ताईनगर पिंप्राळा गट नं.२८,३०,३२ व ३४ मध्ये खेळणी व ओपन जीम साहित्य बसविणे. | रु.१०,०३,४३८/- |
| ६५. | प्रभाग क्र.०९ पिंप्राळा गट नं.३४८ जिल्हा बँक कॉलनी ओपनस्पेसला चेनलींग फेन्सींगसह विकसीत करणे. | रु.९,९९,६००/- |
| ६६. | प्रभाग क्र.०९ पिंप्राळा गट नं.२३+२२ पंचायत ओपनस्पेसला चेनलींग फेन्सींग करणे. | रु.१०,३०,०००/- |
| ६७. | प्रभाग क्र.०८ पिंप्राळा गट नं.४० द्रौपदी नगर ओपनस्पेसला चेनलींग फेन्सींग करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे. | रु.२०,००,०००/- |
| ६८. | प्रभाग क्र.०९ पिंप्राळा गट नं.६/१ ओपनस्पेसला चेनलींग फेन्सींगसह विकसीत करणे. | रु.१०,०३,८८०/- |

| | | |
|---|---|---|
| ६९. | प्रभाग क्र.१५ मेहरुण अंतर्गत इक्बाल कॉलनी पुला लगतच्या नाल्यास संरक्षण भिंत बांधणे. | रु.४०,००,०००/- |
| ७०. | प्रभाग क्र.१८ मेहरुण अंतर्गत स.नं.१७ मधील मुख्य रस्ते खडीकरणासह डांबरी करणे. | रु.४०,००,०००/- |
| ७१. | प्रभाग क्र.१९ मेहरुण अंतर्गत स.नं.२१ मधील रस्ते खडीकरणासह डांबरी करणे. | रु.३०,००,०००/- |
| ७२. | प्रभाग क्र.१२ मधील गजानन हौ.सोसायटी मधील श्री.किशोर ढाके यांचे घरापासुन ते शिवरोड पावती नगर अजिंठा हौसींग सोसायटी मधील पी.ई.पाटील यांचे कॉलेज पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२२,८४,०४८/- |
| ७३. | प्रभाग क्र.१२ अजिंठा हौसींग सोसायटी मधील ओपन स्पेस समोरील उताराचा रस्ता कॉक्रीटचा करणे. | रु. ७,२७,१९७/- |
| ७४. | प्रभाग क्र.१५ मेहरुण गावठाण अंतर्गत बुरुजा पासुन ते महादेव मंदीरापर्यंत व्हाया मेहरुण स्मशान भुमी पर्यंत तसेच जय दुर्गा पतपेढी पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.४०,००,०००/- |
| | एकुण रक्कम :- | रु.१०,६९,६७,०२९/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६२ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सोनवणे धिरज मुरलीधर**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६)** जळगांव शहरातील पिंप्राळा शिवारात फायर स्टेशन उभारणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.कुलभुषण विरभान पाटील यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.महापौर :-** कुलभुषण भाऊ.

**श्री.कुलभुषण पाटील :-** विषय मान्य.

**मा.महापौर :-** मयुर भाऊ.

**श्री.मयुर कापसे :-** अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-** आदरणीय सुनिल भाऊ, सर्वानुमते मंजुर आहे का ?

**श्री.सुनिल महाजन :-** मंजुर आहे.

**नगरसचिव :-** रियाज भाई. आदरणीय रियाज भाई.

**श्री.रियाज बागवान :-** मंजुर

**नगरसचिव :-** यानंतर मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचे जळगांव महानगरपालिका महासभा ठराव क्र.४०४ दि.२०/०२/२०१६ अंतिमत: विखंडीत करणेबाबतचा शासन निर्णय क्र.जमपा/२०१७/प्र.क्र./४३-नवी/४५, मंत्रालय, मुंबई दि.१२/०१/२०२१ चा शासन निर्णय प्राप्त झालेला आहे. सदरचा ठराव हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५१ (३) नुसार अंतिमत: विखंडीत शासनाने केलेला आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** कोणता ठराव आहे नगरसचिव साहेब हा ? महापौरताई या ठरावाबाबत तोडीशी माहिती मला द्यावी की, कोणता ठराव होता कारण फक्त क्रमांकाने लक्षात येत नाही.

**नगरसचिव :-** याच्यात, महानगरपालिका सदस्यांच्या मानधनात वाढ करणेबाबतचा हा प्रस्ताव होता. त्याचा ठराव केलेला होता तो विखंडीत करण्यात आलेला आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ओके.

**नगरसचिव :-** तद्नंतर तत्कालीन जळगांव नगरपालिका ठराव क्र.४६३ दि.२०/०२/१९९९, ठराव क्र.७७ दि.२२/११/२००३ व जळगांव महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र.८५ दि.२२/०१/२००४ प्रथमता निलंबीत

करणेबाबत मा.उपसचिव यांच्या स्वाक्षरीने शासन निर्णय क्र.जमपा/२०१९/प्र.क्र.२४/नवि-२५ मंत्रालय मुंबई दि. ०७/१२/२०२० चा शासन निर्णय प्राप्त झालेला आहे. सदरचे जे ठराव आहे ते निलंबीत करण्यात आलेले आहे. या आदेशाविरोध अभिवेदन करायच असल्यास आदेशाच्या दिनांकापासुन ३० दिवसात करता येतील असा शासन निर्णय प्राप्त झालेला आहे. सदर शासन निर्णयाच्या प्रती मा.महापौर महोदया, मा.सभापती, स्थायी समिती, मा.आयुक्त सो., आणि किरकोळ वसुली विभाग यांना देण्यात आलेल्या आहेत.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** याची थोडक्यात जर माहिती सांगितली तर बरं होईल ताई.

**नगरसचिव :-** याच्या प्रती संबंधीत विभागांना देण्यात आलेल्या आहेत.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** विषय निदान काय होता ऐवढ कळविले तर बर होईल.सभागृहाला माहिती होईल. विषय सांगावा.

**नगरसचिव :-** विषय असा आहे. श्री.नितीन पवार व श्री.वसंत शाह यांच्या अर्जानुसार त्यांना महानगरपालिकेच्या मालकीची ६x२० चौ.फु. जागा ३ वर्षासाठी भाडेपट्टयाने देण्याबाबतचे ठराव होते. हे निलंबीत करण्यात आलेले आहेत. या संदर्भातली सर्व माहिती संबंधीत विभागात उपलब्ध आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ओके.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३६८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील पिंप्राळा शिवारामध्ये जवळपास ७० ते ८० हजार लोकवस्तीचा भाग असून त्याभागात बरेचशे व्यापारी संकुले तसेच उदयोग व्यवसाय संबंधीचे छोटे मोठे व्यवसाय देखिल आहेत. त्याचप्रमाणे हा भाग दाट रहिवासी वस्तीचा देखिल आहे. परंतू त्याठिकाणी काही कारणास्तव कुठल्याही ठिकाणी आग लागली असता त्याठिकाणी आपल्या महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या फायर स्टेशन येथुन आग विझविण्यासाठी अग्निशमन विभागाची गाडी येईपावेतो बराच वेळ होवुन जातो. कारण या अंतर्गत एक रेल्वे गेट देखिल आहे व काही वेळेस ते गेट बंद देखिल असते. सदर रेल्वे गेट उघडल्यानंतर अग्निशमन विभागाची गाडी घटनास्थळी पोहचते तोपर्यंत बऱ्यापैकी आगीमध्ये नुकसान झालेले असते. अश्या पध्दतीचे अनुचित प्रकार होवु नये म्हणून पिंप्राळा शिवारामध्ये एक फायर स्टेशन उभारणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६२ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- कापसे मयुर चंद्रकांत**

**मा.महापौर :-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतसाठी उभे राहावे ही विनंती.

**राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.**

**सही/-**
**(भारती कैलास सोनवणे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**